**प्रेसनोट** दि.२२/०१/२०२५

## रस्ता सुरक्षा अभियाना अंतर्गत वाहन रॅलीचे आयोजन

जिल्हा विधी व सेवा प्राधिकरण सोलापूर, पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर, शहर वाहतुक विभाग सोलापुर शहर आणि प्रादेशीक परिवहन कार्यालय सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत शहरातून दि.२२/०१/२०२५ रोजी वाहन रॅलीचे आयोजन करण्यात आले.

सदर रॅलीची सुरुवात सोलापूर जिल्हा न्यायालय येथून करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश श्री मोह. सलमान आझमी यांनी भुषविले. कार्यक्रमासाठी सोलापूर जिल्हा न्यायालयाचे न्यायाधिश, जिल्हा विधी सेवा व प्राधीकरणाचे न्यायाधिश श्री उमेश देवर्षी, मा. पोलीस आयुक्त, सोलापूर शहर श्री एम. राज कुमार, पोलीस उपायुक्त (मुख्यालय) श्री अजित बोऱ्हाडे, सहाय्यक पोलीस आयुक्त (वाहतुक) श्री सुधीर खिरडकर, सोलापूर प्रादेशिक परिवहन विभागाचे अधिकारी, पोद्दार इंटरनॅशनल स्कुलचे विर्थी हजर होते. रॅलीची सुरुवात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश श्री मोह. सलमान आझमी व मा. पोलीस आयुक्त सोलापूर शहर श्री एम. राज कुमार यांनी हिरवा झेंडा दाखवून केली.

सदरची रॅली जिल्हा न्यायालय येथून सुरु होवून रंगभवन चौक - डफरीन चौक - रेल्वे स्टेशन - मोदी पोलीस चौकी - सातरस्ता - गांधी नगर - गरुनानक चौक - संत तुकाराम चौक - आम्रपाली चौक मार्गे पोलीस मुख्यालय सोलापूर शहर येथे समाप्त झाली.

सदर रॅलीमध्ये शहर वाहतुक शाखा व पोलीस मुख्यालयाचे कर्मचारी, सोलापूर बार असोसीएशनचे ॲडव्होकेट्स, राईडर ग्रुपचे सदस्य, तसेच पोद्दार इंटरनॅशनल स्कुलचे विद्यार्थी मोठ्या संखेने सहभागी झाले होते.

रॅलीमधून नागरीकांना रस्ता सुरक्षा नियमांचे पालन करण्याचे आणि वाहतूक सुरक्षिततेचे महत्व पटवून देण्यात आले. रॅलीदरम्यान जनजागृतीपर घोषवाक्ये आणि फलकांव्दारे रस्ता सुरक्षेचा संदेश देण्यात आला. ही रॅली रस्ता अपघातांमध्ये होणारी जीवितहानी टाळण्याच्या दृष्टीने प्रभावी ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

**( सुरज जी. मुलाणी )**
पोलीस निरीक्षक,
शहर वाहतुक शाखा (उत्तर)
सोलापूर शहर

Scanned with OKEN Scanner